# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**९६) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ३०.०१.२०२६**

जिल्हा : अहिल्यानगर

| मागील आठवड्यातील हवामान (२३/०१/२०२६ ते २९/०१/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (३१/०१/२०२६ ते ०४/०२/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | दिनांक | ३१ | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | १ |
| २८.८ | २९.४ | २९.४ | २९.२ | २९.४ | ३०.० | २९.८ | कमाल तापमान (अंसे) | ३२ | ३१ | ३१ | ३२ | ३० |
| १३.१ | १२.७ | १२.९ | १२.५ | १३.१ | १३.५ | १३.३ | किमान तापमान (अंसे) | १७ | १६ | १६ | १८ | २० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ढग स्थिती (आकाश) | २ | २ | २ | ४ | ५ |
| ८२ | ८३ | ८१ | ८३ | ७९ | ७७ | ८१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६३ | ५८ | ५५ | ५३ |
| ४९ | ५१ | ५२ | ४९ | ४९ | ५० | ५२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २७ | २६ | २५ | २३ | २२ |
| १.२ | १.७ | १.४ | १.३ | १.२ | १.४ | १.३ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ११ | ३ | ३ | ५ | ५ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **दि. ३१ जानेवारी व १ फेंब्रुवारी रोजी आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) शेतकरी बंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वतः ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा. |
| संदेश | | गहू: तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब ७५% डब्ल्यु पी ३० ग्रॅम १० लिटर पाण्यातून किंवा टेब्युकोनॅझोल ५०% + टायफ्लोक्झीस्ट्रोबीन २५% डब्ल्यु जी १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| रब्बी ज्वारी | काढणी | पक्क होत असलेल्या ज्वारी पिकाचे पक्षांपासून संरक्षण करावे. ज्वारीच्या दाण्याच्या टोकाजवळ काळा ठिपका दिसून आल्यास ज्वारीची काढणी करावी व ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवावीत. तदनंतर पिकाची मळणी करुन सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| गहू | दाणे भरण्याची अवस्था | गहू पिकास पेरणीनंतर ८० ते ८५ दिवसानंतर दाणे भरण्याच्या अवस्थेमध्ये वारा शांत असताना पाणी द्यावे जेणेकरून गहू पिक पडणार नाही.<br>गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे, प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब ७५% डब्ल्यु पी ३० ग्रॅम १० लिटर पाण्यातून किंवा टेब्युकोनॅझोल ५०% + टायफ्लोक्झीस्ट्रोबीन २५% डब्ल्यु जी १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| हरभरा | घाटे सुटण्याची अवस्था | घाटेअळीचा प्रादुर्भाव समजण्यासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावीत. यामध्ये मोठ्या प्रमाणावर पतंग अडकले जाऊन प्रजननास आळा बसतो. तसेच घाटेअळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क फवारणी करावी.<br>रासायनिक नियंत्रण:<br>इमामेक्टिन बेंझोंएट ५% एस जी ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा क्विनॉलफॉस २० मिली प्रति १० लिटर पाणी यापैकी एका रासायनिक किटकनाशकाची करावी. |
| मका | फुलोर्याची अवस्था | अमेरिकन लष्करी अळीचे नियंत्रण:<br>यांत्रिक पद्धती: अंडीपुंज, समुहातील अळया वेचून राकेलमिश्रित पाण्यात टाकुन नष्ट कराव्यात. सामुहिकरित्या नर पतंग आकर्षित करून मारावेत. अळीचा प्रादुर्भाव लक्ष्यात येण्यासाठी प्रति एकरी चार कामगंध सापळे लावावेत.<br>रासायनिक नियंत्रण:<br>क्लोरँट्रनिलीप्रोल १८.५% एस सी ४० जी.ए.आय./ हेक्टर किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५% एस जी ८ ग्रॅम प्रति लि. या प्रमाणात फवारणी करावी. किंवा<br>स्पिनेटोरम ११.७ एस सी ०.५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. किंवा<br>इमामेक्टीन ५%+ बेन्झोएट ल्युफेनुरॉन ४०% डब्लू.जी.०.२ ग्रॅम किंवा नोव्हालुरॉन ५.२५% + इमामेक्टीन बेंझोएट ०.९% एस सी ३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| उन्हाळी भुईमुग | पेरणी पूर्व तयारी | जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात पेरणी करता येईल अशा बेताने पेरणीपूर्व ओलीत करावे.<br>भुईमुग पिकाचे सुधारित वाण जसे फुले उन्नती, टी.ए.जी.-२४, टी.जी.-२६, टी.पी.जे.-४१, जे.एल.-५०१ |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | खरेदी करावे.<br>उन्हाळी भुईमुगाची पेरणी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी परंतु तापमान १८ डिग्री सिल्सिअस पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त वाढत नाही तोवर पेरणी करू नये.<br>उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी हेक्टरी ५ टन शेणखत/ सेंद्रिय खत जमिनीत मिसळावे. |
| ऊस | सुरु ऊस लागवड | सुरु ऊस लागवड करण्यासाठी को. ८६०३२ (नीरा), फुले २६५, फुले १०००१, फुले ११०८२, फुले ऊस १५०१२, फुले १३००७, को. ९४०१२ (फुले सावित्री), को. ९२००५ यापैकी एका वाणाची निवड करावी.<br>बेणे प्रक्रिया: लागणीपूर्वी बेणे १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १०-१५ मिनिटे बुडवावे व नंतर अॅसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू अनुक्रमे १ किलो व १२५ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून त्यात कांडया ३० मिनीटे बुडवून लगेच लागण करावी. |
| कांदा | रांगडा | रांगडा कांदयाची ५० टक्के माना पडल्यानंतर काढणी करावी.<br>सततची पानाची वाढ चालू असल्यास हलकासा ड्रम फिरवावा व त्यानंतर १५ ते २० दिवसांनी कांदयाची काढणी करावी.<br>काढणी नंतर कांदा ४-५ दिवस पातीसहीत शेतात ओळीत सुकवावा.<br>३ ते ४ से.मी. मान ठेवून पात कापावी.<br>कांदयाची प्रतवारी करुन कांदा विक्रीसाठी पाठवावा. |
| कांदा | रब्बी/ उन्हाळी | रब्बी/ उन्हाळी कांदयाच्या लागवडीसाठी सपाट वाफ्यावर लागवड करावी.<br>त्यासाठी वाफे दोन मीटर रुंद व जमिनीच्या उतार प्रमाणे वाफ्याची लांबी तीन ते पाच मिटर ठेवून रान बांधणी करण्यापूर्वी चांगले कुजलेले शेणखत टाकावे. रोपे लागवडी पुर्वी- ५० किलो नत्र, ५० किलो शेणखत व ५० किलो पालाश प्रती हेक्टरी टाळावे.<br>रोपाची लागवड १५ x १० से.मी. अंतरावर करावी. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : ३०.०१.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**